# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १३६ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०३/२०१८

**१) लग्नाचे आमीष दाखवुन बलत्कार करुन लग्नाकरीता नकार दिल्याने गुन्हा नोंद . :—**

सन २०१४ ते आज पावेतो यातील फिर्यादीस आरोपीने लग्नाचे आमीष दाखवुन सन २०१४ पासुन ते सन २०१७ पर्यत अत्याचार करुन आता आरोपीने लग्नाकरीता नकार दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अल्पवयीन मुलीस लग्नकरण्याचे उद्देशाने पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक ०९/०३/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, ११ महिने २५ दिवसा पासुन पेपर देण्याकरीता दिनांक ०९/०३/२०१८ चे सकाळी ०९.०० वाजता दरम्यान गेली असता ती सायंकाळी पेपर संपल्यावर घरी परत न आल्याने फिर्यादीने तिच्या बाबत चौकशी केली असता तिला यातील आरोपीने फिर्यादीचे मुलीस लग्नकरण्याचे उद्देशाने मोटार सायकलवर बसवुन पळवुन नेल्याबाबत व ती अनुसुचीत जातीची असल्याबाबत आरोपीला माहित असुन सुध्दा पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३६६,३६३(अ) भादवी.सहकलम ३(२)(५)अजाजका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी मा. टिक्कस हे करीत आहेत.

**३) शेतातील मोटार पंप व ईलेक्ट्रीक स्टार्टरची चोरी . :—**

दिंनाक १२/०३/२०१८ चे २३.०० ते १३/०३/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील तुळशीराम बाजीराव मंडारी वय ७० वर्ष, रा. मेहगाव यांचे शेतातील धान पिकाला पाणी देण्याकरीता विहीरीवर लावुन ठेवण्यात आलेल्या २ ऍनसन कंपनीच्या २ मोटार पंप, २ व ३ हार्स पावरच्या ईलेक्ट्रीक स्टार्टर असा एकुण ७,०००/—रु. चा माल कोणतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) शेत शिवारात इसमाचे प्रेत मिळुन आले. . :—**

दिंनाक ०२/०३/२०१८ ते १४/०३/२०१८ चे ०९.२१ वाजता दरम्यान यातील मृतक आंनदराव मुरारी गजभिये वय ३७ वर्ष, रा. खराशी याची पत्नी ५ महिण्यापुर्वी मरण पावली, तेव्हा पासुन मृतक मानसिक रुग्नासारखा वागत होता व जेवन करीत नव्हता व इकडे तिकडे फिरत होता. दिंनाक ०१/०३/२०१८ ला गावाकडे पेट्रोलपंप येथे आला व दिनांक ०२/०३/२०१८ ला घरी कोणालाही न सांगता निघुन गेला त्याचा शोध घेतला असता मिळुन आला नाही दिनांक १४/०३/२०१८ चे ०९.२१ वाजता दरम्यान मृतक याचे प्रेत खरबी शेत शिवारात चिखली रोड जवळ मिळुन आल्याने फिर्यादी प्रशांत देवराम गजभिये वय ३७ वर्ष, रा. विवेकानंद कॉलोनी पेट्रोलपंप यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर करीत आहेत.

**५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १४/०३/२०१८ चे २०.३० ते २०.४० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन हे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. बावणे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**६) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १४/०३/२०१८ चे १६.१० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिऊन दारुचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहेलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. दुर्गे वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) अवैध देशी दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १४/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, मोहाडी व तुमसर येथे अवैध देशी दारु अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८३ लिटर हातभट्टी दारु +१०० किलो सडवामोहा साहित्य किंमती ११,८००/–रु. तसेच जुगारतुन किंमती १५५/–रु. असा एकुण ११९५५/- रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १४/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनाकरीता ६ ईतर वाहनांवरती – ९० केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**महिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.